Vol 4 Issue 4 Oct 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-4 | Oct-2014
Available online at www.aygrt.isrj.org

'जागतिकीकरण आणि मराठी भाषेचे भवितव्य'

भोर उज्ज्वला लक्ष्मण

रा. ब. नारायराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर.

सारांश :- २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर राष्ट्रीय–आंरराष्ट्रीय पातळीवर प्रचंड घडामोडी होऊन खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या नव्या संकल्पनांचा उदय झाला. खाजगीकरण, उदारीकरणाची परिणती जागतिकीकरणात करणारी प्रक्रिया हि संपूर्ण जगावर परिणाम करणारी आधुनिक युगातील दोन महायुध्दानंतरची सर्वात मोठी व सर्वव्यापी अशी वैश्विक घटना ठरली.

प्रस्तावनाः–

जगावर गारूड करणाऱ्या या संकल्पनेचे स्वरूप सांगताना अनेकांनी विविध प्रकारची स्पष्टीकरणं मांडली आहेत.

जागतिकीकरणाची संकल्पना :–

१.विकिपीडिया :– "जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूंची किंवा घडामोडींची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया."

या संज्ञेचा उपयोग सहसा आर्थिक जागतिकीकरणाच्या संदर्भात केला जातो. ज्यात व्यापार, विदेशी थेट गुंतवणूक, भांडवल, प्रवास आणि तंत्रज्ञान यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी उघडे किंवा खुले केले जाते.

२.संजय जोशी :– "जागतिकीकरण म्हणजे मुख्यतरू व्यापारासाठी विविध देशांनी एकमेकांना जोडून घेत एकमेकांच्या भूमीत खुलेपणाने व्यापार करण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे"

एका अर्थागने उद्योगधंद्यांचे 'खाजागीकीकरण' आणि सरकारी धोरणातले 'उदारीकरण' या जागतिकीकरणाच्या पर्व अटीच म्हणायला हव्यात. त्यामुळे खाजागीकरण, उदारीकरण या संकल्पना आणि त्यांचे परिणाम जागतिकीकरणाचा विचार करताना जोडूनच येतात.

३.राजेश पाटील :– "गावपातळीवरील व्यवहारात प्रत्येक माणूस कोणाही व्यक्तीकडून आपल्याला गरजेची असलेली वस्तु किंवा सेवांची कोणत्याही आडकाठी शिवाय देवाण घेवाण करू शकत असे. त्याच पद्धतीने एका देशात निर्माण होत असलेल्या वस्तु किंवा सेवा आणि मनुष्यबळ यांची देवाण घेवाण कोणत्याही आडकाठी शिवाय जगभरात कुठेही होऊ शकणे यालाच खरे जागतिकीकरण म्हणता येईल." आता जागतिकीकरण या अर्थाने झालेले नाही. जगभर श्रमिकांचे एक राष्ट्र, एक राज्य निर्माण होईल हे मार्क्सचे स्वप्न भंग पावले असून, आता जगभर भांडवलदारांचे एक राष्ट्र उभारण्याच्या दृष्टीने धडपड सुरू आहे.

'जागतिकीकरण' या संकल्पनेची हि स्पष्टीकरणे पाहता 'जग हीच एक बाजारपेठ आणि त्या बाजारपेठेत उत्पादक आपल्या निवडी व कुवतीनुसार कोणतीही वस्तु व सेवा विकत घेऊ शकतो.' मात्र एवढ्यापुरतीच ही

संकल्पना मर्यादित म्हणता येत नाही तर भांडवली अर्थव्यवस्थेची संबंधित अशी हि संकल्पना प्रत्यक्षात अतिशय गुंतागुतीची म्हणावी लागते. भांडवली गुंतवणुकीची क्षमता असलेले भांडवलदार, दर्जेदार उत्पादनाची सोयी–सुविधा व क्षमता असलेले उत्पादक आणि सुजाण ग्राहक यांच्या भूमिकाही यात महत्वाच्या ठरतात. यातून जागतिकीकरणाचे विविध क्षेत्रांवर दूरगामी परिणाम संभवतात.

यामुळेच २१ व्या शतकाच्या उत्तरार्धात जेंव्हा भारताने आपली मिश्र अर्थव्यवस्था टाकून भांडवलशाहीभिमुख जागतिकीकरणाचा स्वीकार केला आणि हळूहळू गावापासून देशापर्यंत, समाजापासून संस्कृतीपर्यत, बोलीपासून भाषेपर्यंत आणि व्यक्तिगत उदरनिर्वाह, अर्थार्जनापासून देशाच्या आर्थिक धोरणांपर्यंतची सर्व क्षेत्रे आणि व्यवहार याजागतिकीकरणाच्या कक्षेत सापडली तेव्हा जनमाणसातील अनेकांची मने धास्तावली. जग हीच एक बाजारपेठ बनून माणसे अधिक जवळ आल्याचे बोलले जात असतांनाच अनेक प्रश्न आणि शंका कुशंकांचे वादळ उठले. यातील एक प्रश्न म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेशी निगडीत असा 'जागतिकीकरणाच्या' रेट्यात मराठी भाषेचे भवितव्य काय?' या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी अर्थातच, आगोदर हा प्रश्न पडण्यास कारणीभूत परिस्थिती व मराठी भाषेची पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागेल.

मराठीची पार्श्वभूमी व स्थिती–गती :–

मराठी भाषेला प्राचीन व संघर्षशील परंपरा लाभली आहे. प्रारंभावस्थेतच संस्कृतचे वर्चस्व मोडून काढीत सर्व सामन्यांच्या मराठीची प्रस्थापना करण्यासाठी ज्ञानेश्वर दृ महानुभावादी प्रभूतींना मराठी ग्रंथलेखनव्दारे बंडाचे निशाण उभारावे लागले. बहुजनांच्या मराठी बोलीला अभिजनांत आणून बसविण्याची क्रांती करताना,

"माझा म–हाटाची बोल कौतुके ।
परि अमृतातेही पैजा जिंके ।"

एवढे म्हणून ते थांबले नाहीत, तर ज्ञानेश्वरी, लीळाचरीत्रादी चरित्रग्रंथ, स्फुट अभंग अशी विविध प्रकारी व वैविध्यपूर्ण रचना करून त्यांनी मराठीला सुंदर, संपन्न व समृध्द बनविले. साहित्याचे माध्यम, व्यवहारांचे साधन आणि ज्ञानाची वाहक म्हणून असलेले तिचे सामर्थ्य समाजाला दाखवून दिले. संस्कृताभिमानी वर्चस्ववाद्यांची मते व दुराभिमानाचे खंडण करून या लोकभाषेला ज्ञानभाषेच्या पंक्तीत आणून बसविले. त्यामुळे या भाषेचे महत्व ध्यानी येऊन तिला लोकश्रयाबरोबरच राजाश्रयही लाभला. अशा भक्कम पायावर उभारलेल्या मराठी भाषेला पुढे मुस्लिम राजवटीच्या काळात उर्दु–फारसी आक्रमणाचा आघातही सोसावा लागला. परंतु,

"संस्कृत वाणी देवे केली ।
प्राकृत काय चोरापासून झाली ।

असा खडा सवाल करत लोकशिक्षकाच्या भूमिकेतून कार्य करणा–या एकनाथांनी तिला जगविण्याचे काम केले.

" आम्हा घरी धन, शब्दांचीच रत्ने,
शब्दांचीच शस्त्रे, यत्न करू ।
शब्दचि आमूच्या जीवाचे जीवन
शब्द वाटू धन जनलोका ।"

असे म्हणत आपल्या अभंग गाथेच्याद्वारे शब्द धन वाटणाऱ्या संत तुकारामांनी तिला सामर्थ्यशाली बनविले आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहारकोशाद्वारे' तिला शासन दरबारी सन्मानाने आणून आत्मविश्वासाची ज्योत प्रज्वलित करून नवनवे आविष्कार घडविले.

इंग्रज राजवटीच्या आधुनिक काळात जेत्यांची भाषा म्हणून इंग्रजीचे आगमन झाले असले तरी आक्रमण झालेले नव्हते. त्यामुळे हे 'वाघिणीचे दूध' पचवितांनाही आपण 'मराठी भाषेचे शिवाजी' असल्याची जाणीव विसरली गेली नव्हती. उलट इंग्रजी भाषेतील ज्ञानाच्या आधारावर मराठीला अधिक परिपुष्ट करून मराठी अस्मिता फुलविण्याचे प्रयत्न चिपळूणकर, आगरकर, टिळक, म. फुले, लोकहितवादी आदी प्रभुतींनी केले. स्वा. सावरकर, माधव ज्युलियन श्री.म. माटे आदींनी भाषाशुध्दीकरणाची चळवळ चालवून पर्यायी मराठी शब्दांद्वारे मोठीच भर घालण्याचे व मराठीची घडण करण्याचे काम केले. ग्रंथनिर्मिती, कोशवाङ्म इत्यादीद्वारे मराठी भाषेची घडण व विकासाच्या या कामी एलफिन्स्टन, जॉर्ज जव्हीर्स, मेजर कँडी इत्यादी मिशनरी व इंग्रज अधिका–यांचेही योगदान

लाभले.

असे असले तरी जीत दृ जेते संबंधातून मराठीवर व मराठी भाषकांवर पडलेला इंग्रजीचे प्रभाव, इंग्रजी संस्कृती, सहवास, साहित्य याद्वारे मराठीत झालेला इंग्रजी शब्दांचा भरणायामुळे इंग्रजीचे प्राबल्य वाढत गेले. त्यातुलनेत पर्यायी मराठी निर्मिण्याचे भक्कम प्रयत्न झाले नाहीत. स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतराव चव्हाणांसारख्या जाणत्या व संवेदनशील नेत्याने 'मराठी साहित्य व संस्कृती मंडळ' सारख्या मंडळांची स्थापना करून मराठी भाषा संशोधनाला व साहित्य संस्कृती संवर्धनाला चालना देण्याचा प्रयत्न केला. मराठीला राजभाषेचा दर्जा देऊन लोकसभा ह्या ज्ञानभाषा झाल्या पाहिजेत असा आग्रह धरला. यातून विश्वकोशनिर्मिती, संस्कृतीकोशनिर्मिती महत्वाची कामे झाली. मात्र हे प्रयत्न पुरेसे ठरले नाहीत. मराठी भाषेला मराठी अस्मितेशी व लोकव्यवहाराशी जोडून घेणे झाले नाही. त्यामुळे जनमानसात इंग्रजीचा अभिमान व मराठीचा दुराभिमान हेच चित्र अधिक ठळक होत गेले. यामुळे पहिल्या जागतिक मराठी परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलतांना कुसुमाग्रजानांही हि खंत तीव्रतेने व्यक्त करावीशी वाटली आणि"राजभाषेचा मुकूट परिधान केलेली मराठी लक्तरे नेसून भीक मागत शासनदाराशी उभी आहे." अशा शब्दात तिच्या अवस्थेकडे लक्ष वेधावे लागले. मात्र तुटपुंज्या प्रयत्नांनी मराठीची अवस्था सुधारू शकली नाही.

पुढे तर इंग्रजी हीच ' ज्ञानभाषा ' असल्याचा समज दृढ होत गेला. साहित्य, संस्कृती व्यतिरीक्त इतर अनेक क्षेत्रे मराठीच्या वापराची व संवर्धनाची वाट पाहत असल्याचे लक्षात घेतले गेले नाही. उलट इंग्रजी शाळांचे पेव फुटून मराठी वापराची व व्यवहाराची क्षेत्रे आकुंचन पावत गेली. रंगनाथ पठारेंच्या शब्दांत " आपल्या मुलाबाळांना 2000 वर्षापेक्षा अधिक मोठे आयुष्य असलेल्या ज्ञानाचे, संस्कृतीचे संचित सहज, स्वाभाविकपणे उपलब्ध असतांना ते त्यांना नाकारून आपण त्यांना परक्या तथाकथित जगन्मान्य भाषेच्या अरण्यात पाठविण्याचे कौर्य धडधडीतपणे, उजळ माथ्याने केले. परक्या भाषेतील शब्दांचे आंतरीकीकरण करून, त्यांना देशीरूपी देऊन आपण आपली भाषा परिपुष्ट करत होतो.

तोनाद आता सोडला " (महाराष्ट्र टाईम्स ' संवाद ' दिनांक 24 फेब्रुवारी 2013 पृ.१) यामुळे अशोक शहाणे यांनी लिहिल्याप्रमाणे " मी लिहिले तेव्हा मराठी भाषा टिकेल की नाही अशी परिस्थिती नव्हती. दरम्यान काळात आई बापाची निदान एक पिढी ज्यांच्या पोरांना मराठी बोलता येतं, पण लिहिता अन् वाचता येत नाही अशी तयार झाली. मराठीच्या वापराचं क्षेत्र कमी होत चाललं आहे, किंवा ते बोलाचालीच्या पातळीवर राहिल आहे, लिहिण्याच्या पातळीवर आलेलं नाही. असा प्रकार दरम्यानच्या काळात घडला आहे " (दै– लोकसत्ता – ' लोकरंग ' पृ १ दि. २७ ऑक्टोबर २०१३) अशी परिस्थिती निर्माण झाली.

त्यानंतर आलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि संगणक, इंटरनेट, मोबाईल इत्यादी जगण्याचाच अपरिहार्य भाग झालेली साधने व क्षेत्रे प्रामुख्याने इंग्रजी भाषेचा अवलंब करणारी असल्याने मराठी भाषेच्या शंका उत्पन्न झाली. यातच आलेल्या जागतिकीकरणाच्या घोंगावत्या वादळात इंग्रजी बरोबर इतरही भाषा आणि संस्कृतीचं होऊ लागलेलं आक्रमण थोपवून धरणं अशक्य झालं. परिणामी जागतिकीकरणाच्या रेट्यात मराठीचा संकोच होत जाईल आणि ती हळूहळू मृत्यूपंथाला लागेल अशी भीती व्यक्त होऊ लागली.

ही भीती अनाठायी आहे, असे म्हणणे जसे बरोबर ठरणार नाही तसेच ही भीती तंतोतंत खरी होऊ शकते हे म्हणणेही खरे ठरणार नाही. अर्थात, यासाठी जागतिकीकरणामुळे प्राप्त झालेल्या नवनव्या संधींचा जसा लाभ उठवावयास हवा तसाच मराठी भाषेपुढे असलेल्या व निर्माण झालेल्या आव्हानांचाही जाणीवपूर्वक विचार व्हायला हवा. संधींचा लाभ व अव्हानांचा मुकाबला या बाबींची अंमलबजावणी कशी होते, यावर मराठीचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

जागतिकीकरण आणि मराठीचे भवितव्य :–

१.साहित्य आणि संस्कृती

" मराठीच्या विविध बोलींनी समृद्ध केलेली? आपली भाषिक परंपरा अशा शुल्लक वावटळीने सोडून पडण्याइतकी तकलादू निश्चितच नाही. मराठीच्या विविध बोली बोलणार्‍या भाषिक समूहांना अजूनही इंग्रजीच्या आक्रमणाचा वारा लागलेला नाही. आपला अंगभूत गोडवा जपत त्या अजूनही खूप मोठ्या भाषिक समूहांचा संप्रेषण व्यवहार सांभाळत आहेत. या व्यवहारात इंग्रजी शब्दांचा शिरकाव झालाय हे मान्य, परंतु बोलींनी तसे काही आंगतूक शिरलेले शब्द आपापल्या पद्धतीने वाकवून दृ मोडून आपल्यात सामावून घेतले आहेत " (महाराष्ट्र टाईम्स दि. २४ फेब्रु. २०१३) अशा शब्दांत रमेश इंगळे उत्रादकर यांनी रेखाटलेल्या मराठीच्या भवितव्याचे आशादायी चित्र निश्चित आश्वासक व अभिमानास्पद आहे. याचबरोबर अशोक कौतिक कोळी यांनी लावलेला " या बोली जोपर्यंत आपला

संसार थाटून आहेत, तोपर्यंत मराठीला मरण नसून उलटपक्षी बोलींच्या वापराने ती अधिक सकस, सुदृढ, सशक्त होणार आहेत. मराठीच्या विविध बोलीमध्ये अनेक शब्द, वाक्प्रचार, म्हणी, लोकोक्ती, लोकासंकेत यांचा खजिना दडलेला आहे " हा विश्वासाचा सूरही मराठी सामर्थ्य व जागतिकीकरणाच्या काळात तिला असलेल्या नवनव्या संधींची जाणीव करून देणारा आहे. मात्र त्यासाठी, त्यांनीच म्हटल्याप्रमाणे जाणिवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. ही गरज भागवितांना साहित्यिकांनी जसे आपआपल्या बोलीतून सकस लेखन करायला हवे आहे. तसेच त्यांनी, लोकभाषेतून लेखन करतानाच लोकभाषेला ज्ञानभाषा बनविण्याची परंपरा निर्मिणाऱ्या चक्रधर, ज्ञानेश्वर, तुकाराम, म. फुले इत्यादींच्या प्रयत्नांना अनुसरायला हवे आहे. याशिवाय उच्चशिक्षितांनी स्वभाषेतून नवीन ज्ञाननिर्मिती करायला हवी. ग्रामीण, दलित समाजातील व विविध बोलींतील शब्दधनाचा वापर करून नवशब्द निर्मिती साधायला हवी. पु. ल देशपांडे यांनी 1987 च्या न्युजर्सितील आपल्या भाषणात म्हटलं आहे "ज्या भाषेत ज्ञानेश्वरांनी गीतेसारख तत्वज्ञान सोप्या भाषेत मांडलं आहे त्यापेक्षा कठीण असं काय आहे जे मराठीत मांडता येणारा नाही." याचा विचार उच्चशिक्षितांनी मराठी भाषानिष्ठेने करायला हवा. मराठयांनी आटकेपार झेंडे लावतांना ग्वाल्हेर, इंदोर, तंजावर अशा परप्रांतात राज्य स्थापनेबरोबरच मराठी संस्कृती व भाषाही प्रस्थापित केली. हे या संदर्भात लक्षात घ्यायला हवे.

चिनी , ग्रीक संस्कृती प्रमाणेच भारतीय संस्कृती प्राचीन व वैविध्यपूर्ण आहे. अशा संस्कृतीचे आकर्षण जगाला मोठया प्रमाणात आहे. विविध विद्यापीठेतून संस्कृत मराठी भाषा व साहित्याचा अभ्यास करणारे परदेशी विध्यार्थी , लावणीसारख्या परंपरागत कलांना परदेशीत मिळणारा भरघोस प्रतिसाद , मराठी चित्रपटांना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळणारे यश व लोकप्रियता , विजय तेंडूलकर व तत्सम नाटककरांच्या नाटकांचे होणारे स्वागत , नामदेव ढसाळ , दया पवार इ. साहित्यिक व दलित साहित्याची चर्चा व अनुवाद हे याचे पुरावे म्हणता येतील. हे लक्षात घेता साहित्य, संस्कृती व अनुवाद क्षेत्रातही मराठीचे भवितव्य निर्मिण्याला प्रचंड वाव आहे. इ–बुक्सच्या जमान्यात मराठीच्या प्रचार प्रसाराची कितीतरी मोठी संधी उपलब्ध आहे. याशिवाय पर्यटन , हॉटेलिंग इ. क्षेत्रदृष्टया मराठीला मोठा वाव आहे.

२. मराठी भाषकांचा व्यवहार व वर्तन

जागतिकीकरणाच्या युगात आपली भाषा जपण्याची , ती वाढवण्याची , आपल्या संस्कृतीचा प्रचार प्रसार करण्याची एक मोठी संधी निर्माण झालेली आहे. मात्र या संधीचं सोनं करून मराठीचं भवितव्य ठरवणं हे आपण इतर मराठी भाषाकांबरोबर व्यवहारात मराठी किती वापरतो यावर जितकं अवलंबून आहे. तितकचं जगातल्या इतर भाषांबरोबर तांत्रिक भाषांवर सेवेतून किती व कसा व्यवहार करतो यावरही अवलंबून आहे. म्हणूनच आपण बाजार , उपहारगृह , शाळा – महाविध्यालयं, कार्यालय, कारखाना, न्यायालयं, दवाखाना, रिक्षा–टॅक्सी अशा सर्वच ठिकाणी मराठी बोलणं, चॅट, एसेमेस, इ–मेल, ब्लॉग, ट्विटर व्हॉट्सॲप वर मराठीत व्यवहार करणंय आपलं ज्ञान सोप्या मराठीत व्यक्त करण्याचा प्रयत्न सातत्यानं करणय मराठीचा अभिमानाने अंगीकार करून तसा संदेश कृतीतून इतरांना देणय इतर भाषकांना प्रमाण मराठी शिकवणं, ई – लर्निंग सुविधा तयार करणं, अभिनव सॉफ्टवेअर प्रणाली निर्माण करणं व सतत वापरणं अत्यावश्यक आहे. अशा उपयांतून मराठी ही ज्ञानभाषा आहे, ती विज्ञान–तंत्रज्ञांची भाषा आहे असा विश्वास पटविण्यात यशस्वी होण्याबरोबरच मराठीचेही उज्ज्वल भवितव्य घडविण्यात यश प्राप्त करता येईल.

वरील काही उपयांबरोबरच सौदी अरेबिया, चीन, रशिया, कोरिया इ. देशांनी सर्वसामान्य लोकांना मुख्याप्रवाहामध्ये आणण्यासाठी स्वभाषेतून शिक्षण देण्याची, विज्ञान–तंत्रज्ञान, आर्थिक व्यवहार, राजकीय व्यवहार, प्रशासन ह्या सगळ्या गोष्टी एका स्वकीय अशा सोप्या , लोकाप्रयुक्त पण प्रमाणित केलेल्या भाषेमधून देण्यासाठी दीर्घकाळ जिद्दीने चालवलेल्या खटाटोपाची आणि सर्वसामान्यांच्या विकासासाठी स्वभाषेचा चहूबाजूंनी विकास करण्याची अवलंबलेली रणनीती आपणही अवलंबायला हवी. कोट्यवधी शेतकरी , कष्टकरी , बलुतेदार यांची जी कामाची , व्यवहाराची ज्ञानभाषा तिला व त्यांना प्रतिष्ठा देऊन अभिजनांच्या भाषेत मानाचं स्थान घ्यायला हवं. लोकांच्या या रोजच्या व्यवहाराच्या भाषेवर उचित संस्कार करून प्रमाण भाषेच्या रुपात व आजच्या वैज्ञानिक शब्दकोशांमध्ये आणायला हवं. जागतिकीकरणाबरोबर आलेल्या माहिती तंत्रज्ञानाची संधी मराठमोळ्या लोकांना माहिती तंत्रज्ञानाच्या सामुहिक, सहभागी वापराद्वारे अशी आपली लोकाभिमुख प्रमाणभाषा व ज्ञानभाषा बनवणे व रूढ करून दाखवणे शक्य आहे. तेव्हा आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे मराठीचाच वापर करून लोकांनीच लोकांसाठी अशी प्रमाणभाषा बनवणे उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने गरजेचे आहे. महाजालावर झालेली 'मुक्तज्ञानकोशाची निर्मिती', त्यावरून 287 भारतीय भाषांतून लिहिले गेलेले 3.5कोटी लेख आणि ५ कोटी लोकांचे यासाठी मिळालेले योगदान ही बाब जागतिकीकरणाने प्राप्त करून दिलेल्या संधीचा परिणाम दाखविणारी आणि मराठीच्या उज्ज्वल

भवितव्याचा विश्वास निर्माण करणारीच म्हणावी लागेल.

'महाराष्ट्राचं वेगळेपण असं की महाराष्ट्रात मुंबई आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी आहे. हे देशाचा आर्थिक अजेंडा ठरणारं शहर आहे.' या शहरात नोकरी व्यवसायाच्या निर्मित्ताने येणार्‍या अमराठी भाषिकांना मराठी मुलखातील निवासामुळे मराठीचा वापर करण्याची गरज भासते. पण ठरलेल्या कालावधीत ठरलेल्या दर्जाचे मराठी खात्रीशीरपणे शिकता येईल , अशी सोय महाराष्ट्रात कुठेही नाही. त्यामुळे त्यांना मराठीशिवाय आपले काम भागवावे लागते. या अभावाला जोड मिळते टी मराठी भाषकांच्या अनाग्रही वृत्तीची. मराठीतूनच व्यवहारचा आग्रह व तसे मराठीतून व्यवहार करण्याला प्राधान्य तर पराभाषिकांच्या भाषेतून संवाद साधण्याची तडजोड करतात. त्यामुळे मराठीतून व्यवहार करण्याला प्राधान्य तर मिळत नाही पण मराठीच्या प्रांतातच मराठी राजभाषा ठरण्याऐवजी दुय्यम दर्जाची ठरत जाते. ही बाब मराठीचे भवितव्य धोक्यात आणण्याला कारणीभूत ठरू शकते. म्हणूनच मराठी भाषिकांनी आपली दुराभिमानीवृत्ती टाकून मराठीच्या आग्रहाची निग्रही वृत्ती अवलंबणे जसे गरजेचे आहे, तसेच अमराठी भाषकांना व्यावहारिक मराठी शिकविण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासन, विद्यापिठे, शैक्षणिक संस्था यांनी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी मराठी भाषेच्या अध्यापनाचे आधुनिकीकरण होणे आवश्यक आहे. मुंबई विद्यापिठातील जर्मन विभागाच्या प्रमुख डॉ. विभा सुराणा व त्यांच्या सहकार्‍यांनी यासाठीच्या प्रकल्पाला प्रारंभ केला असून यासंदर्भात, 'अन्य भाषांसाठी मराठी वर्तमान, स्वरूप आणि भवितव्य' या विषयावर मार्च 2013 मध्ये एक चर्चासत्र घेतले आहे. तसेच तज्ज्ञांची मते जाणून घेण्यासाठी आक्टो. 2013 ला घेतलेल्या चर्चासत्रानंतर तयार करण्यात आलेल्या पाठ्यपुस्तक व सरावपुस्तकाचे 27 फेब्रु 2014 ला मराठी भाषादिन प्रकाशन करण्याचे नियोजिले आहे. अशा प्रयत्नांची संख्या वाढायला हवी. "जो समाज नवनव्या गरजांची निर्मिती करतो तो समाज आपल्या भाषेलाही वाढवितो" या यशवंत मनोहरांच्या मताचा विचार जाणीवपूर्वक व्हायला हवा.

३. बोलीभाषा वैभवाचे जतन, देशीकरण व आधुनिक तंत्रज्ञान

भारतातील लोकभाषांच्या सर्वेक्षणाचा महत्वपूर्ण प्रकल्प राबविण्या-या डॉ. गणेश देवींनी दाखविल्याप्रमाणे 'मराठी' ही सहिष्णू भाषा आहे. ती दक्षिणेकडील 'द्रविडी भाषाकुल' (तमिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम) आणि उत्तरेकडील 'इंडो आर्यन भाषाकुल (गुजराती बंगाली) या दोन्ही भाषाकुलांशी सहकार्य करत जगत वाढत आली आहे. तिने इंग्रजीशी टक्कर तर दिली आहेच शिवाय आपल्या परिघातल्या इतर भाषाही जगू, टिकू दिल्या आहेत. प्रगती साधणा-या सामाजिक चळवळीतून तिची जडणघडण होत गेली आहे. त्यामुळे इंग्रजीसह इतर सगळ्या भाषांचे शब्द तिने मोठया प्रमाणात स्वीकारले, पचवले व आत्मसात केले आहेत. मराठीचे हे वैशिष्ट्य अभ्यासून, परक्या भाषेतील शब्दांचे आंतरीकीकरण करून त्यांनी देशी रूप देण्याचे प्रयत्न , मराठी भाषेची व्याप्ती वाढविणारेच ठरविणारे आहेत.

याचबरोबर डॉ. देवींनी म्हटल्याप्रमाणे "महाराष्ट्राकडे भाषांची विविधता आहे. तेच उद्या आपलं आर्थिक भांडवल बनू शकतं. कारण बोलीभाषा गेली 70 हजार वर्षे अस्तित्वात आहेत. आता जगभरात असं झालं आहे की कॉम्प्युटर तंत्रज्ञानामुळे पुन्हा एकदा भाषा मौखिक स्वरूपातच राहतील. म्हणजे तुम्ही जे बोलता ते तसंच्या तसं उतरवून काढणारं कॉम्प्युटर तंत्रज्ञान आता विकसित झालं आहे. त्यामुळे लिखाणाचं महत्त्व कमी होऊन भाषेच्या मौखिक स्वरूपालाच पुन्हा महत्व येणार असं चित्र आहे. म्हणजे भाषेचं जे लेखी स्वरूपावर अवलंबित्व वाढलं होतं ते कॉम्प्युटर तंत्रज्ञानामुळे झपाटयाने कमी होत जात आहे. त्यामुळे भविष्यात लिखाण, लिपी हे इतिहासजमा होईल आणि भाषा परत एकदा मौखिक होतील अशीही शक्यता आहे. त्यामुळे सगळ्या प्रगतीचा आधार भाषा हाच असणार आहे. भाषाधारित तंत्रज्ञान विकासासाठी भाषा आणि भाषावैविध्याची गरज आहे. भाषेच्या व्यवहारावर कॉम्प्युटर आपले नियम ठरवतो. त्यामुळे जितक्या भाषा विपुल प्रमाणात असतील तितकी प्रगती होईल" आज मराठीमध्ये 52 बोलीभाषांचे टिकून असलेले वैभव पाहता मराठीच्या भवितव्याची कल्पना येऊ शकते.

अर्थात हे सर्व एकदम व एकाएकी घडणारं नाही. त्यासाठी मराठीच्या बोलींच्या जतन व संवर्धनाची प्रक्रिया घडायला हवी. त्यासाठी डॉ. देवींसारखे निष्ठावंत अभ्यासक, कार्यकर्ते व प्रकल्प उभे राहायला हवे. अशा प्रयन्तात सातत्य राखले जायला हवे. हे जसे व जेवढे खरे तेवढे हेही खरे की, या बोलींच्या अभिव्यक्तीसाठी अनुरूप असं तंत्रज्ञान इंग्रजीप्रमाणे मराठीलाही सहज उपलब्ध व्हावं. विवेक सावंतांनी 'एमकेसील' द्वारे असे प्रयत्न आरंभून मराठी भाषेच्या संवर्धनासाठी तंत्राधारित मोहीम यशस्वी करून दाखविली आहे. एम के सी एल (डझ्ब्स) च्या 4500 केंद्रमध्ये केवळ 100 रु शुल्कात , सर्वत्र आयटी टूल्समध्ये मराठी भाषा कशी वापरायची ते शिकविणारा 'आयटीत मराठी' हा दोन तासांचा सुलभ अभ्यासक्रमउपलब्ध करून देण्यात आला आहे.बहुजनांना आधुनिक ज्ञानप्रक्रियेत आणणा–याना अशा प्रयत्नाची सातत्यपूर्णता व व्यापकता वाढणे मराठी भवितव्याच्या दृष्टीने गरजेचे आहे.

४.बोलीभाषा वैभवाचे जतन, देशीकरण व आधुनिक तंत्रज्ञान

"महाराष्ट्र हा जवळ जवळ १२ कोटी मराठी लोंकाचा प्रचंड असा एक भाषक गट आहे. त्यामुळे जगात मराठी गटाचा संख्यानिहाय १५ व क्रमांक आहे. ही जेवढी आपल्या संख्येच्या दृष्टीने जमेची बाजू आहे, तेवढीच आपल्या अस्मितेच्या व अस्तित्व्व्या दृष्टीने जमेची बाजू आहे, तंत्रज्ञानाला स्थानिक व जागतिक बाजारपेठीची भाषा कळते.त्यामुळे जर मराठी भाषांकाएवढा मोठा समूह मराठीची कास धरणार असेल व संगणकीय,मोबाईल फोन,टब्लेट ,आणि तत्सम तंत्रज्ञांनाचा वापर करून मराठीतून दैनदिन व इतर व्यवाहार करण्यासाठी आग्रही असेल,त्यामुळे तशा तंत्रज्ञानेसाठी एक मोठी बाजारपेठ निर्माण होत असेल तर तंत्रज्ञान देण्या–या कंपन्या मराठी भाषेच्या वापर तंत्रज्ञानेतून सुलभ करण्यासाठी वाटेल टे करायला तयार होतील." अर्थात यासाठी' दृढ निर्धार ,आपल्या मराठी भाषेवरील अविचल निष्ठा,प्रेम व अपरिहर्यतेचा ध्यास' घ्यायला हवा.नव्या जगाचा केद्रबिंदू भारत आणि चीनकडे झुकत असल्याचा जाणीवेने या देशातील भाषा शिकवण्याचे आवाहन ब्रिटीश सरकार करत आहे. तर य भाषा शिकण्यासाठी अमेरिकेन सरकारने विशेष तरतूद केली आहे.बिपिओद्वारे अनेक उच्चशिक्षित युरोप अमेरिकेत जाऊन स्तायिक होत आहेत. या संधी मराठीचे भवितव्य घडविण्यासाठी पुरेपूर वापरायला हवे.

विवेक सावंतांना म्हटल्याप्रमाणे आज मराठीला कालानुरूप करण्यापेक्षा माहिती तंत्रज्ञानाने मराठी भाषेशी अनुरूप होत राहण्याची खरी गरज आहे.आधुनिक ज्ञानयुगच्या आणि तंत्रज्ञांनाच्या संदर्भात मराठी मानसिकता कालानुरूप होण्यासाठी प्रयत्न करण्याची खरी गरज आहे.अर्थातच कालसापेक्षा तंत्रज्ञानाच्या संदर्भात मराठी मानसिकता कालानुरूप होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे,

अर्थातच कालसापेक्ष तंत्रज्ञान निर्मिती व वापरातील मराठी भाषकांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरणारी आहे.मराठी या मातृभाषेतून सर्व क्षेत्रीय शिक्षण ,रोजगाराभिमुक मराठी अभ्यासक्रम रचना नवमराठी शब्दनिर्मिती व कोशाना प्रोत्साहन,महाराष्ट्र राज्यात मराठीतून व्यवहार होण्याची सक्तीअशा बाबीही यासाठी उपकारक ठरू शकतात.

एकंदर,जागतिकीकरण हे मराठी भाषेच्या भवितव्यावरील संकट नसून मोठी संधीच आहे.गरज आहे ती भाषा,समाज,संस्कृती यांच्यातीलइल अनुबंध जाणून'भाषा जतन' ,यासाठी न्यूनगंड,दुरभिमान टाकून स्वयंपूर्तीने सर्वतोपरी प्रयत्न करण्याची कारण शेवटी

भाषा म्हणजे संस्कृतीचा सारांश
आणि भविष्यातील अभूद्याची उज्ज्वल अशा

या विचाराबरोबरच मराठीचे भवितव्य जाणून घेऊ इच्छिना–यांनी जीज्ञासुनी श्री गजानन खातू यांनी जागतिकीकरण– परिणाम आणि पर्याय या ग्रंधातुन केलेलं विवेचन तसेच भाषा आणि राजकारण या संपादित ग्रंथातील जो समाज नवनव्या गरजांची निर्मिती करतो तो समाज आपल्या भाषेलाही वाढवतो असे मत मांडणारे यशवंत मनोहारांचे विवेचन मुळातून पाहणे उपयुक्त ठरणारे आहे.

संदर्भ ग्रंथ :–

1.www.wikipedia.org
2.www.maayboli.com
3.patilrajesh143blogspot-in
4.दैनिक महाराष्ट्र टाईम्स संवाद दृ दि. २४ फेब्रु २०१३
5.दैनिक लोकसत्ता– लोकरंग दि. २७ ऑक्टो २०१३
6. दैनिक लोकसत्ता– लोकरंग दि. १8 ऑगस्ट २०१३
7.अंतर्नाद – संपादक भानु काळे, दिपाळी विशेष अंक नोव्हे. डिसें. २०१३
8.भाषाविकास आणि राजकारण – संपा. तेगमपूरे, नरवाडे, जुन्ने.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org